# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक २६७/२०२४ दिनांक:- १७/०७/२०२४.

**“लक्झरी मोटार कार खरेदी-विक्रीमध्ये व कार भाडयाने लावून नफा मिळवून देतो, असे खोटे आश्वासन देवुन नागरिकांना नफा देण्याचे आमिष दाखवून मुख्य आरोपी व त्याचे साथीदारांच्या मदतीने चैनीचे जीवन जगण्यासाठी व मौजमजा करण्यासाठी फिर्यादी व साक्षीदार यांचेकडून बॅक खात्याद्वारे व रोख स्वरुपात रक्कम घेवून घातला लाखोंचा गंडा”**

दिनांक १५/०६/२०२४ रोजी श्री. शम्स तबरेज शेरमोहम्मद मन्सुरी, व्यवसाय-मासेविक्रेता, मिरारोड पुर्व यांनी काशिमिरा पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्यावरुन काशिमिरा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नंबर ३३५/२०२४ भा.द.वि.कलम ४२०, ४०६ प्रमाणे आरोपी जयेशकुमार पारसमल मेहता, वय ३२ वर्षे, रा. रुम नं.१४०४ , बिल्डींग नंबर ०३, मॅनओपस सोसायटी,वेस्टर्न हायवे जवळ, काशिमिरा, मिरारोड पुर्व याचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

यातील आरोपी जयेशकुमार पारसमल मेहता, याने फिर्यादी तसेच साक्षीदार श्री.समरजितसिंग कर्तारसिंग चड्डा, रा.भाईंदर यांना मोटार कार खरेदी- विक्रीमध्ये तसेच सदरच्या कार भाडयाने लावून नफा मिळवून देतो असे खोटे सांगुन त्यांना नफा देण्याचे आमिष दाखवून फिर्यादी यांच्याकडून बॅक खात्याद्वारे व रोख स्वरुपात ४५,६८,०००/- रुपये व साक्षीदार श्री.समरजितसिंग कर्तारसिंग चड्डा यांच्याकडून बॅक खात्याद्वारे व रोख स्वरुपात ६१,८८,०००/-रु. घेवून फिर्यादी व साक्षीदार यांची फसवणुक केली आहे. तसेच साक्षीदार नामे श्री. नदीम नुरमोहम्मद पटेल यांची ५,००,०००/- रु कि.ची एम.एच.४८.ए.सी.३८४४ या क्रमांकाची मारुती सियाझ मोटार कार ही आरोपीत याने त्याची सासु आजारी असल्याचे सांगून घेवून जावून ती परत न देता तीचा अपहार केला आहे. अशा प्रकारे आरोपीत याने फिर्यादी व साक्षीदार यांची एकूण १,१२,५६,०००/- रुपयांची फसवणुक केली म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील आरोपी जयेशकुमार पारसमल मेहता, यास नमुद गुन्हयामध्ये लागलीच अटक करुन त्याच्याकडे गुन्हयातील अपहार केलेल्या एम.एच.४८.ए.सी.३८४४ या कारबाबत तपास केला असता त्याने सदरची कार गहाण ठेवली असल्याचे निष्पन्न झाले असून ती गुन्हयामध्ये जप्त करण्यात आली आहे.

अशा प्रकारे आरोपीने आणखी लोकांची फसवणुक करुन त्यांच्याकडून घेतलेल्या कार इतरत्र गहाण ठेवून त्यावर पैसे घेतले असल्याचे दिसून आल्याने आरोपीकडून तपासादरम्यान आणखी दोन कार जप्त करण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे आरोपीने लोकांची फसवणुक करुन गहाण ठेवलेल्या एकूण १० कार गुन्हयामध्ये जप्त करण्यात आल्या असून आरोपीने फिर्यादी व इतर साक्षीदार यांची एकुण १,५५,५६,०००/- रु एवढी मोठी रक्कम घेवून फसवणुक केली असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपीने लोकांची फसवणुक करुन गहाण ठेवलेल्या खालील वर्णनाच्या कार गुन्हयामध्ये जप्त करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | मॉडेल |
|---|---|---|
| १. | MH12QM2543 | मर्सिडीज कंपनीची GLA 200 |
| २. | PB11CF087 | बीएमडब्ल्यु कंपनीची X1 |
| ३. | MH48AC3844 | मारुती कंपनीची CIAZ ZXI |
| ४. | MH12NP4659 | हयुंदाई कंपनीची I 20 |
| ५. | MH15GR0839 | मारुती कंपनीची CIAZ SMART HYBRID ALPHA |
| ६. | MH04KR3721 | टाटा कंपनीची ALTOZ XZ 1.2 |
| ७. | MH04JV4091 | महिंद्रा कंपनीची MARAZZO M2 |
| ८. | MH06CD2533 | मारुती कंपनीची ERTIGA VXI CNG |
| ९. | MH48AC8070 | मारुती कंपनीची S CROSS 1.6 ZETA |
| १०. | MH48CC7081 | मारुती कंपनीची XL6 SMART HYBRID ZETA |

सदरची कारवाई श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, मिरारोड, श्री. विजयकुमार मराठे, सहायक पोलीस आयुक्त मिरारोड विभाग व श्री. राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमीरा पोलीस स्टेशन यांच्या सुचनां व मार्गदर्शनाखाली काशिमिरा पोलीस ठाण्याचे सहा.पो.निरी. मंगेश बुऱ्हाडे, पोहवा/संतोष क्षिरसागर यांनी केलेली आहे.

----------oooooo-----------